*Review Of Research*
Vol.2, Issue. 9, June. 2013
**ISSN:-2249-894X**
Available online at www.reviewofresearch.net

ORIGINAL ARTICLE

# *ग्रामीण कवितेतील स्त्रीजीवन*

**Vikas Veer**

***सारांश:***

ज्या कवितेत ग्रामीण जनजीवनाचे चित्रण ग्रामीण संवेदनशीलतेने केलेले असते तिला ग्रामीण कतिवा असे म्हटले जाते. या कवितेमध्ये खेडे, खेडयाशी संलग्न असेले कृशिजीवन, खेडयातील जनजीवनाचे दु:ख, हर्ष, दारिद्रय, रूढी, परंपरा, संस्कृती या सा–यांचा समावेश होतो, असे डॉ. कैलास सार्वेकर म्हणतात. एकूणच मराठी ग्रामीण कवितेची सुरूवात भा.रा.तांबे यांच्या ' गुराख्याचे गाणे ' या कवितेपासून झाल्याचे अभ्यासक सांगतात. तर काही चंद्रशेखरांच्या ' काय हो चमत्कार !' या खंडकाव्यापासून ग्रामीण कवितेचा प्रारंभ मानतात. मात्र मराठी ग्रामीण कवितेचे अवलोकन केले असता ग्रामीण कवितेची सुरूवात लोकसाहित्यापर्यंत मागे आपणास घेवून जाता येते.

***प्रस्तावना :***

सामान्यपणे ग्रामीण स्त्रीच्या मुखी परंपरेने चालत आलेल्या ओव्या, स्त्रीगीते आणि कथाकहाण्या म्हणजेच लोकसाहित्य. हे साहित्य रूढार्थने अशिक्षित, खरे तर अनक्षर आणि त्यातही ग्रामीण स्त्रीला आपल्या मातृवारशाने अनायसे, सहजपणे मिळालेले असते. स्त्री गीतांचा खूप मोठा भाग जात्यावरच्या ओव्यांनी व्यापलेला आहे. दळणकांडण, सडा–सारवण, शेताशिवारातील कामे, बाळाला जोजवणे–झोपवणे ही मातृकर्तव्ये, झिम्मा–फुगडी सारख्या निमित्ताने क्रीडा–गीते, फेराची गाणी, कथागीते असा स्त्री निर्मित साहित्याचा पसारा खूप मोठा आहे. या सर्व स्त्री गीतांमधून स्त्रीच्या दैनंदिन जीवनातील घटना–प्रसंग, भाव–भावना, अपेक्षा–उपेक्षा, रूढी–समजुती या सगळयांचा सहज आविष्कार होतो. शारीरिक कश्ट आणि भावनिक आंदोलने या दोन्हींची अभिव्यक्ती गीतात होते.

स्त्री जीवन हे पुरूषाच्या तुलनेने जगाच्या पाठीवर सर्वत्रच उपेक्षित जीवन आहे. भारतीय स्त्रीची वेदना तर असीम–अनंत वेदना आहे. आजही त्यात गुणात्मक फरक पडलेलाच दिसत नाही. भौतिक बदलांमुळेच स्त्रीचा बाहय परिवेश काही अंशी बदलेला असला तरी भारतीय समूहमन बदललेले आहे असे म्हणण्यासारखी परिस्थिती नाही. पुरूषाच्या तुलनेत स्त्रीचे स्थान दुय्यम उपेक्षित मानण्यात अजून कोणाला फारसे गैर वाटत नाही. अनक्षर मंडळी त्यांच्या ओबडधोबड ग्राम्य शैलीत त्यांच्या धारणांचा आविश्कार करतात तर नगरी मंडळी त्यांच्या जीवनशैलीला साजेशा दांभिक शैलीतून त्याच धारणांचा आविष्कार करताना दिसतात.

ग्रामीण कवितेतील स्त्रीजीवनाचा विचार करताना थोडेसे लोकसाहित्याकडे पाहिले असता असे दिसते की, भारतीय स्त्रीच्या प्रचंड लोकसाहित्याचा फार मोठा भाग स्त्री–वेदनेचा उद्‌गार असलेल्या साहित्याने व्यापलेला आहे. त्याकडे वरवर जरी नजर टाकली तरी स्त्रीच्या वेदनेची कळ किती खोलवर आहे आणि तिच्या वेदनेचा परिसर किती व्यापक आहे याची कल्पना येते. आपल्याला वेदनेचे वाटेकरी करणा–या परंपरेचे भान नकळतपणे लोकसाहित्यात स्त्रीने व्यक्त केले आहे.

भारतीय समाज हा प्रामुख्याने कृषिप्रधान समाज आहे. स्थिर कृषिप्रधान व्यवस्थेतील जीवन कुटुंबप्रधान जीवन असते. खरे तर ते कुटुंबकेंद्री असते. स्त्रियांच्या कथा–गीतांतून कृषिप्रधान कुटुंबव्यवस्थेची त्या व्यवस्थेतील श्रध्दा–संकेतांची अनेक रूपे दिसतात. स्वाभाविकच पारंपरिक कुशिप्रधान कुटुंबात श्रमाला पर्याय नसतो.स्त्री–पुरूष सगळेच कश्ट करीत असतात. तेंव्हा शिवारात लक्ष्मीची रास पडते. स्वाभाविकच त्या कश्टाचा, श्रमाचा गौरव येथे आहे. श्रमाला प्रतिष्ठा आहे.

' शेती ' ही अर्थव्यवस्था आणि ' गाव ' ही संस्कृतीव्यवस्था असलेल्या भारतीय पर्यावरणामध्ये अनेक स्थित्यंतरे झाली आहेत. आधुनिकतेच्या रेटयामुळे व कांही अंशी वैचारिक परिवर्तनामुळे शहरीकरणाने वेग घेतला. गावे ओस पडू लागली. गावव्यवस्था उद्‌ध्वस्त होत गेली.

या सगळयाचा परिणाम अपरिहार्यपणे कृषिनिष्ठ परंपरेवर झाला आहे. इथली कुटुंबव्यवस्था उद्‌ध्वस्त होत गेली. या कुटुंबाचे भरण–पोशण करणारी स्त्री ही खरेतर भूमाताय परंतू सगळयात जास्त शोशण याच स्त्रीचे झाले. खरेतर स्त्री हा इथल्या संस्कृतीचा केंद्रबिंदू मातृसत्ताक परंपरेमध्ये तिच्या अधिकारांना, हक्कांना स्वतंत्र स्थान होते. तिच्यातील नवनिर्माणचे सर्जनत्व पुरूशांच्या कोरडेपणापुढे प्रभावी ठरत गेले. यातूनच वंशसातत्याला महत्व येत गेले. याच गोष्टींचा फायदा घेउन जिने शेतीचा शोध लावला त्या स्त्रीला घरातच बांधून टाकले. हळूहळू बंधनाच्या माध्यमातून मातृसत्ताकता संपुष्टात आली व पुरूषसत्ताकता आली. एकूणच व्यवस्थेबरोबर या पुरूषसत्तेकतेची बळी इथली कृषिनिष्ठ स्त्री ठरली आहे. कारण नागर स्तरावरील शोषणापेक्षा कितीतरी पटीने अधिक शोषण या स्त्रीचे होत आहे. अशा या भूमिनिष्ठ स्त्रीचे चित्रण बहिणाबाई चौधरींपासून इंद्रजित भालेराव, श्रीकांत देशमुख यांच्यापर्यंत अनेक कवींनी केले आहे. तिच्या जन्मापासून ते आजी आणि मृत्यूपर्यंतच्या विविध रूपांचे प्रभावी प्रकटन कृषिनिष्ठ कवितेमध्ये झालेले दिसते.

भूमी (शेती) आणि स्त्रीचे अत्यंत सख्य आहे. त्या दोघी एकमेकींत इतक्या मिसळून गेल्यात की, त्यांच्यातील वेगळेपण अधोरेखित

**Title:** *ग्रामीण कवितेतील स्त्रीजीवन*
**Source:Review of Research [2249-894X] BARBOLE A.N. yr:2013 vol:2 iss:9**

करणे अशक्य आहे. सातत्याने अवर्षणात सामोरी जाणारी आणि पाउस पडताच अंगावरील दागदागिने पेरणीसाठी बहाल करणारी, कापूस पिकवूनही स्वतः उघडी राहणारी स्त्री यांच्यात काहीही फरक नाही. अशा या स्त्रीला जन्मतःच दुय्यमत्व प्राप्त होते. मुलाचा जन्म वंशसातत्य अधोरेखित करणारा असल्याने त्याचा जन्माचा आनंद आणि मुलीच्या जन्माचे दुःख, इथूनच तिच्या संघर्षाला सुरूवात होते. जन्मतःच दुय्यमत्व घेवून येणा—या स्त्रीचे कृषिनिष्ठ कवितेमध्ये जे चित्रण आले आहे त्याचे तीन टप्प्यांत वर्गीकरण करता येते.

1.पुरूषप्रधान व आर्थिक संस्कृतीची बळी असलेली स्त्री.
2.सर्जनशील असूनही मूक राहणारी संयमी स्त्री.
3.शोषण पचवून टिकून राहणारी व गावभूमीशी नाते सांगणारी विद्रोही स्त्री.

1)पुरूषप्रधान व आर्थिक संस्कृतीची बळी असलेली स्त्री :—

स्त्रीच्या जन्माची कथा सांगताना प्रतिमा इंगोलो लिहितात,

लेक झाला खुशी झाली । आजा वाटे साकरपान
लेकी तुवा व जलम । माय लळे बाळातीन

लेकीचा जन्म ही घटना जिच्यात स्त्रीत्व आहे अशा मातेलाच दुःख करते. कारण या पुरूषसत्ताक व्यवस्थेमध्ये तिच्या स्वतंत्र अस्तित्वाची कुणीही दखल घेत नाही. उलट तिचे शोषणच केले जाते. पुन्हा एक नवा जीव, आपण शोषणासाठी जन्माला घातला, याचे दुःख तिला आहे, कारण :

लेकीचा जलम जणू । फुटणारी लाही
खाणारा म्हणतो कशी । भाजलीच नाही
(इंद्रजीत भालेराव)

अशी तिची अवस्था असते. पापाचरण, नैतिक बधने, योनिशुचित्व अशी कितीतरी अवास्तव बंधने स्त्रीवर लादली जातात. ती तारूण्यात येते तेंव्हा साहजिकच तिचे आकर्शण वाढत जाते. तिच्या आकर्शणाचे सर्व संदर्भ या कवितेने रेखाटले आहेत. स्त्रीबद्दलचा तरूणाईतील प्रेमभाव व्यक्त करणारे हे कवी काहीसे एकांगी पध्दतीने व्यक्त होतांना दिसतात. या अभिव्यक्तीमध्ये तिच्या भावनेला फारशी किंमत असत नाही.

फुललेली बोंड । वेचता वेचली
गर्द तुरीच्या पाटयात । ओटी सांडली
(जयराम खेडेकर)

पुन्हा मी तिला पाहिले अंगभर
काचोळीला चांदण्याचा जर
आणि माझा मला पडला विसर
मिठीत थरके भरातली ज्वार
(ना.धो. महानोर)

प्रेमभाव ही जीवनातील अत्यंत सुंदर घटना. सुंदर स्वप्न खरं तर प्रेमभावाला जात, धर्म, अर्थ, वय असल्या कशाचेही बंधन नसतेय परंतु प्रेमभावाच्या अवतीभवती या सगळया तटबंदी असतात. विशेषतः कृषिनिष्ठ परंपरेतील प्रेमभावाच्या अभिव्यक्तीला गावपणाची जबरदस्त तटबंदी आहे. ही तटबंदी अनेक कवितांमधून वेश, उंबरा, शिव (सिमारेषा) आणि घरंदाजपणा या रूपांमधून व्यक्त होते. या तटबंदीवर ' गावपणा ' चे म्हणजे पारंपरिक पुरूषसत्तेचे, सरंजामीचे आणि भोगवादाचे जबरदस्त दडपण आहे. या तटबंदीमुळे अनेकदा दोघांच्याही वाटयाला अपयशच येते. मनातल्या मनात त्या प्रतिमा उराशी बाळगत व्यक्त होत राहणे एवढेच त्यांना शिल्लक उरते. ऐन उभारणीच्या काळातच त्यांच्या भावनांना सुरूंग लागत जातात व कळत नकळत एक समंजस शहाणपण यायला लागते. ते देशीजाणिवेच्या कवितेतून कसे व्यक्त होते ते पाहण्यासारखे आहे.

डहूळते उरी सांज । ओल्या आठवांचे धुके
माझ्या उदास पाणोठी । रान पाखरांचे मुके
(जयराम खेडेकर)

भरलेले डोळे / सासरची वाट / उतरली घाट
वेदनेचा / अचानक गेलीस / पसरलं धुकं
रान पडलं मुकं / पाखरांचं
किंवा
ओवताना काही पोत / गळा आठवते आण
जपलेल्या गुपिताचे / पुन्हा कसे मागू दान
(जयराम खेडेकर)

अदृश्य तटबंदीने साकोळणारे हे जगणे कोतेपणाच्या जाणिवेने भरून जाते. मनात असूनही आयुष्यभर प्रेमभाव व्यक्त न करणा—या सख्याबद्दल इंद्रजित भालेरावांची कुळंबिणी म्हणते,

मव्हा संसार चालवा । नीटनेटका म्हणून–
मुकामुकाच राहिला । सारं मनात आणून

कुणाचा तरी संसार फुलावा म्हणून मनातील तटबंदी अधिकच घट्ट करणारा महानोरांच्या कवितेतील नायक म्हणतो,

तुझी साद / तुझे आशीर्वाद / प्राणांचे दुवे मेळवीत गेले
तुझाी साद / तुझे आशीर्वाद / घरभार दिव लावून गेले

संयमितपणे व्यक्त होणा–या प्रेमभावामागे दोन शक्यता दिसतात. एक म्हणजे उपरोल्लेखित तटबंदी अद्याप तशाच आहेत. त्या ओलांडण्याचं धाडस दोघांनाही नाही. दुसरी शक्यता म्हणजे त्यांच्यातील समंजसपणा भोगापेक्षा वेगळया उच्च स्तरावरील प्रेमभाव अधिक सुंदर दिसतोय तसाच तो अधिक जिवंत राहतो, अशी काहीशी धारणा असावीय पण इथे प्रभावी आहे ती सांस्कृतिक तटबंदीची धारणा. या तटबंदीच्या समर्थनामागे पुन्हा दोन शक्यता दिसतात. एक म्हणजे या तटबंदी पुरूषप्रतीकांच्या प्रतिनिधी आहेत आणि या तटबंदी इथली स्त्री ओलांडत नाही. तिच्या या घुसमटलेपणाचे हे एक प्रकारे उदात्तीकरण आहे आणि दुसरी शक्यता म्हणजे या कवितांवर आर्थिक सरंजामी व घरंदाजपणाचा (ज्या पूर्वीचे लोप पावल्या आहेत) मोठा प्रभाव आहे. घरंदाजपण आणि आर्थिक सुबत्ता स्त्रीचे शोषण वाढवीत असते. महानगरीय स्तरावर हे शोषण वस्तुवत बनत आले आहे. गावापातळीवर अद्याप स्त्रीला वस्तुत्व आले नसले तरी, एका अर्थाने तिच्या शोषणाचे उदात्तीकरण म्हणजेच ही समंजसपणाची भावना आहे.प्रेमाच्या टप्यावरील कृषिनिष्ठ परंपरेतील स्त्री अत्यंत देखणी, तारूण्यमयी, यौवन आपल्या नकळत सांडणारी, चांदण्यांत वितळणारी, तळयात गढूळ होणारी, तंग ज्वानीची, अर्पणोत्सुक असणारी अशी येते. तिची ही सगळी रूपे एका अर्थाने निसर्गाशी नाते सांगणारी व प्रकृतीशी समांतर जाणारी असली तरी या अभिव्यक्तीमागे पौरूश, त्याचा अहंकार, भोगवादाचा छूपा संदर्भ सातत्याने येत राहतो. अर्थात, हे वास्तव चित्रित करून एक सांस्कृतिक सत्यच या कवींनी आपणापुढे मांडले आहे. या संपूर्ण यौवनाच्या व मीलनाच्या प्रक्रियेमध्ये स्त्रीचे प्रतिनिधीत्व मात्र फारसे येत नाही याचीही नोंद आवश्यक आहे.

निसवल्या ज्वरीमध्ये / माझे पोट–याचे अंग
धुणे धुताना दांडात / आज त्याने केले तंग
कणीस चिक्काळी हुरडयात आलं गं
अवंदा लग्नाचं वय माझं झालं गं
(जयराम खेडेकर)
नगं हासूस कारभारणी / दुर्मिळ हाय तुझा रंग
केवडयाची पोटरीला / खरंच डसलं भुजंग
(आनंद यादव)
डोळे थकून थकून गेले
पाखरासारख येउुन जा
पिकं भलतचं भरात जरा
पिकात धुडगूस घालून जा
(ना.धो. महानोर)

हे सगळे खेळ, पावसाची गाणी, रानाचा विरह, तंग ज्वानीची हिरवी बोली मनातल्या मनात रंगवत असताना तिच्या जीवनातील महत्वाच्या टप्पा येतो तो म्हणजे विवाह. विवाह हा स्त्रीच्या जीवनातील जितका सुफलतेचा, भाग्याचा, सर्जनाचा, नवनिर्माणाचा क्षण तितकाच तिचे स्वत्व, स्वातंत्र, हक्क, अधिकार, अल्लडपणा हिरावून घेणारा, स्वतःच्या मनाची ओळख पुसायला भाग पाडणारा असा क्षण असतो. कारण या क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी ' ति ' ला कधीच निर्णयप्रक्रियेत सामावून घेतले जात नाही. हाही पुन्हा तटबंदीचाच बळी. या संदर्भातील वास्तव अनेक कवींनी रेखाटले आहे.

दोरी बांधून गळयात / खुटी रवून भुईत
उभी राहिले गुनानं / दावनितल्या गाईत
(इंद्रजीत भालेराव)
पैजनाची शपथ तुले / नाव मायजो राखजो
सोसण्याचा माया वसा / तू तरी लेकी तोळजो
(प्रतिमा इंगोले)

निवडीच्या, व्यक्तिमत्वाच्या गोष्टी तर गौण राहतातचय परंतु आईसुध्दा तिला भावी दुःखी जीवनाची जाणीव करून देते. ही तिची हतबलता इंगोले यांनी नेमकेपणाने मांडली आहे आणि इथून पुढे सुरू होतो तिच्या संसाराचा खेळ. या खेळाात ती दावणीतील गाय असते. अशी ही व्यक्तित्वहीन व कणाहीन स्त्री उंब–यावरचे माप ओलांडून नव्या उंब–यात प्रवेश करते व उंब–याच्या तटबंदीत जाते. ही तटबंदी हेच तिचे आयुष्य बनते. इथपासून ख–या अर्थाने तिचे शोषण आणि दुय्यमत्व अधोरेखित होत जाते.

2)सर्जनशील असूनही मूक राहणारी संयमी स्त्री :–

सूर्य प्रकाशता भाकरीस थापी ।। अवलास सोपी ।। कालवण ।। ।।
स्वयपाक होता पाटीमध्ये भरी ।। घेई डोईवरी ।। शेती जाई ।। ।।
सर्वासंगे शेती काम करू लागे ।। खाई ना ती मागे ।। घरी घास ।। ।।
भिकारी ब्राम्हण धान्य ती वाटती ।। भू देवा पोशिती ।। ज्योती म्हणे ।। ।।
(महात्मा फुले)

कोंबडा आरवल्याबरोबर पहाटेच उठणारी, उठताच जात्यावर दळण दळणारी, झाडलोट करणारी, चुलीवर भाकर आणि कालवण करणारी, शेतात भाकर घेवून जाणा–या शेतकरी स्त्रीची ' कुळंबीण ' म्हणून कुचेष्टा केली जाते. याची खंत फुले ' कुळंबीण ' या कवितेत व्यक्त करतात. त्यातून कष्टकरी, कामकरी, शेतकरी स्त्रीची व्यक्तिरेखा स्पष्टपणे उभी राहते.

संयम व सहनशीलता हे स्त्रीचे आत्यंतिक स्थायीभाव आहेत. हुंडयासाठी लग्न मोडल्यामुळे आत्महत्या करणारी तरूणी जयराम खेडेकरांच्या कवितेत भेटते. तिने स्वतःचे आयुश्य संपविण्यामागे एक छुपा शोषणाचा संदर्भ आहे. अनेक स्त्रीया मुकाटपणे हे सगळे दुःख सहन करीत राहतात. आयुष्यभर तिच्या वाटयाला रितेपण आणि कोरडेपण येते. माहेर हे तिच्यासाठी पुन्हा दिवास्वप्नच ठरते. खेडेकर लिहितात,

लेक आल्याची पाहून / शेणामातीची माय / खिनभर हरखली
अगस्ताळी सून / दोन भाकरी जास्त टाकताना / चुलीवरच करपली
ताडकन इचारले / वन्सं आता कसं ध्यान झाले ?
ज्याचं त्यालाच जड / तुमचे मधीच उधळत आलं.

अशा त–हेने स्वतःच्याच माहेरी आधारहीन होणारी स्त्री भेटते, तर स्वतःच्याच घरात लेकीसाठी पोरकेपण घ्यावे लागणारी माय तिच्या पदरात आंब्याची कोय बांधून देते. हा कौटुंबिक व सांस्कृतिक संघर्ष येथेच थांबत नाही. कापसाच्या फवारणीसाठी पाचशे रूपये खर्च करणारा नायक आपल्या आईसाठी शंभर रूपयांचे औषण आणत नाही (जयराम खेडेकर) घटनेमागे शेतीचे अर्थकारण महत्वाचे आहे. हातचे पीक गेल्यानंतर होणारी उपासमार टाळण्यासाठी तो आईला दुय्यमत्व देतो, हे त्याचे दुहेरी दुभंगलेपण महत्वपूर्ण आहे.

या कवितेमागे समाजशास्त्रीय विश्लेषण नीट समजावून घेतले तर लक्षात येईल की, भूमिनिष्ठ लोकांची 70 ते 80 टक्के शक्ती उंब–यातील संघर्षातच खर्च पडते. उरलेली शक्ती भूमीच्या (शेती) संघर्षात संपते आणि मग उरते केवह असहायपण. या असहायपणाचा बदला मग तो प्रकृतीरूपी भूमवर सरंजामी पध्दतीने अन्याय करत असल्यामुळेच गावाचे पुढारपण करणा–यांना घराचे कुटुंबपण सांभाळता आले नाही. तिच्यावर अन्याय करणे हाच आपला चिरंतन हक्क आहे, असेच तो मानीत आला. अशा पिचलेल्या स्त्रीचे शोषण व्यक्त करताना प्रभावी चित्रण ही कविता रेखाटते.

बाई जन्माचे धिंडोडे / सांगू कसे, झाकू कसे ?
चुलीतल्या गोवरीला / चुलीमंधी जळायचे
(ना. धों. महानोर )

उले भेगातून माती / वाळी रांजणात पाणी
बसलेले ओसरीत / तरी डोळे खानदानी
(श्रीकांत देशमुख)

असा वाढतो संसार / जग वाढतंच जातं
तरी बाईच्या वाटयाचं / दुःख वाढतंच जातं
(इंद्रजीत भालेराव)

पान्यानं झोडलं तरी / जीव असतेच गरिबाले
नव–यानं कुटलं तरी / मन असतेच ना बाईले
(प्रतिभा इंगोले)

रातचं टपोर चांदनं लुगळयात झेलून
अशा उन्हात आलीस खरी
तव्यावर भाकर अशीच करपते पोरी !
कालचा दिसं कुंवार होता कालची रात जवान होती
दौलत माध्या जिनगानीची कोनाच्या पाशी गहान होती
(विठ्ठल वाघ)

उठ रासुरवाशिन बाई
उठ मध्यम राती मांड दयन तू नीट
अन् चालव बाई घरोट............
.....उठ सासुरवाशिन बाई
उठ जानं शेती कामाचा किती घोर
तू गोटयामधलं ढोर
(बहिणाबाई चौधरी)

चुलीतल्या गोवरीने चुलीत जळणे, रांजणात पाणी वाळणे, नव–याने मारणे या रूपामधून आणि कृतीमधून तिचे असहायपण व्यक्त होते. दावणीतल्या गाईतली ही स्त्री सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक पिळवणुकीला सातत्याने बळी पडत आली आहे. हे कमी म्हणून की काय नांदायला आलेली नव तरूणी सास–याच्या वासनांधपणालाही बळी पडते.

जाता येता वाडयात / तिच्या उरीच्या घसरत्या पदराला
सास–याची ओढाळ नजर / दिवसातून कित्येकदा उतरणारी
ती धास्तावलेली / भयभीत रात्र कलून जाताना

सास–याची तहान अवेळ / मुद्दाम पाणी मागते तांब्याभर
ती खोलीत येते जीव मुठीत घेउुन / अचानक दिवा विझताना
ती किचाळते / पदर ओढताना तिला वाघिणीचे बळ
कचाटयातून निसटते, चवताळते / शिव्या शाप देते
(जयराम खेडेकर)

या सर्व वेदना व्यक्त करण्याचे कोणतेही माध्यम तिच्यापुढे नाही. शेवअी एकच पर्याय उरायचाय तो म्हणते जात्यावर बसल्यावर त्या जात्याशी संवाद साधायचा. या संवादाचीही अवस्थाा कशी आहे हे सांगतांना ना. धों. महानोर लिहितात,

सरलं दळण ओवी अडली जात्यात
उभ्या जन्माचा उमाळा कळ सोसून डोळयांत

जात्याला आपली व्यथा सांगत असताना मध्ये दळण संपते आणि त्या मुक दगडाला तिचे दुःख सांगणेही अपूर्ण राहते. मग उरतो फक्त उभ्या जन्माचा उमाळा, व्यथेला बोलतं करण्याचे तिचे स्वातंत्र्यही हिरावून घेतले जाते. मग तिच्यात आणि गायीत काहीच फरक राहत नाही.

आड रानातल्या भयाण उन्हात / अपु–या झाडाखाली
उन्हाचा मारा चुकत / डोळे मिटून बसलेली गाय
जणू संसाराच्या खस्ता खावून / थकलेली भागलेली माय
(इंद्रजीत भालेराव)

आल्या गेल्याच्या घरात / ती पुरणपोळी रांधायची
उन्हातल्या गायवासरांना / सावलीत बांधायची

ख–या अर्थाने आजीचे हे ' धर्मकारण ' आहे. मानवता आणि मदत हाच तिचा खरा धर्म आहे. जो भूमीशी संबंधित आहे. साहजिकच तिच्या ' अर्थकारणा ' ला मानवी चेहरा असलेला दिसतो.
खरं आहे बाई तुझं / निगुतीच्या तुझ्या संसारात
तू ताकाचं करतेस / मला दुधाचं जमलं नाही.
(जयराम खेडेकर)

असे नोंदवणारी ही आजी न मागता बाळंतिणीच्या घरी तुपाचा डबा पाठवते. भांडवलशाही आणि जागतिकीकरण गावापर्यंत पोहोचले असल्याने आधुनिक सूनबाई ताकाचे पैसे करतेय परंतू आजीला दुधाचे जमले नाही. आजच्या अर्थकारणाचा मानवी चेहरा हरवत आला आहे याचे सूचक भान ही कविता व्यक्त करते, तर भालेरावांची आजी :

आजा देवाघरी गेला आजी उदास होउुन
घरादाराला सोडून शेती राहिली जाउुन
जीव रिकामा झालेला गुतविला मळयामधी
सदा भजन देवाचं रात–दिस गळयामधी

ही एका अर्थाने मोक्षाची खूण आहे. स्वतःच्या ऐहिक उपभोगांविशयी उदास होत जाणेय परंतु कर्तव्यात मात्र कसर न करणे, मी मोक्षाची जाणीव या कवितेत व्यक्त होते.

3) शोषण पचवून टिकून राहणारी व गावभूमीशी नाते सांगणारी विद्रोही स्त्री :–

सर्वस्व पणाला लावणारी, आयुष्याची राखरांगोळी करून घर–कुटुंब उभे करणारी स्त्री ख–या अर्थाने सक्षम आहे. तिच्यातले आदिमत्व आणि सृजनत्व बहुआयामी आहे. कृषिनिष्ठ परंपरेतील आई–आजीची प्रतिमा एकूणच मराठी साहित्यात वेगळा ठसा उमटवणारी, उठावदार अशी आहे. स्त्रीतले पौरूशत्व हा यातला महत्वाचा भाग, कारण गावभूमीतील या स्त्रीचे दुय्यमत्व तेथे व्यक्त होत असले तरी ती निव्वळ दुय्यम आणि भोगवस्तू म्हणून येत नाही. कुणबिकीमध्ये आणि विकृत प्रतिष्ठेच्या घरंदाजपणामध्ये तिच्यावर अन्याय, अत्याचार होत असले तरी या सर्व अन्यायाला ती नीटपणे व धीटपणे प्रतिक्रिया देते. त्याच्या विरोधात उभी राहते. तिची ही भूमिका तिचे वस्तूवतपण नाकारणारी आहे. तिच्यातले आदिम मातृसत्ताकत्व अनेकदा उफाळून येते. अर्थात, हेच इथले वास्तवही आहे आणि ही सगळी कविता वास्तवाशी समांतर जाणारी आहे.

या तिस–या टप्प्यावरील स्त्री केवळ सगळे पचवून उभी राहते असे नाहीय तर ती या व्यवस्थेला नकार देताना व्यवस्थेच्या विरोधात विद्रोह करते. हिचे हे विद्रोहीपण समीक्षकांनी नीटपणे उलगडले नाही. भूमिनिष्ठ स्त्रीचा विद्रोह हा केवळ नकार देणारा नसून, त्याबाबत नवी व्यवस्था मांडणारा आहे. जयराम खेडेकरांच्या कवितेतील स्त्री, तिच्यावर जेंव्हा सासरा अत्याचार करायचा प्रयत्न करतो, तेंव्हा ती स्वाभिमानाने माहेरी निघून जाते. आयुश्यभर भळभळती जखम घेउुन जगत राहते. एकाकी पडलेला नवरा तिला न्यायला येतो तेंव्हा ती म्हणते,

संसार नुसता सडयासारवणाचा नसतो
हया करपल्या जीवाने
चुलीवर भाकरी तरी कशा भाजाव्यात ?

असा विद्रोह करणारी स्त्री समाधानासाठी पारमार्थिक आणि आध्यात्मिक गोष्टीत बुडून जाते. तिच्या या भूमिकेमागे चिरतररूण वेदना असली तरी जीवनाचे उच्च कोटीचे तत्वज्ञान यातून व्यक्त होताना दिसते. हा विद्रोह कुटुंबापुरता मर्यादित असला तरी ना. धों. महानोरांची नायिका संपूर्ण व्यवस्थेच्या विरोधात विद्रोह करते तिचा नवरा जेंव्हा आत्महत्या करतो व नंतर शासन मदतीची पाने तोंडाला पुसायला येते तेंव्हा

त्या घटनेबद्दलची प्रतिक्रिया महत्वाची आहे.

धाबल्यात जाउुन । फाडलेल्या पदरात
दहा हजार गुंडाळले । साहेबांनी दिलेले
साहेबा समोरच । आक्काडी लावली
आणि ती पुन्हा दुःखाच्या ओझ्यानं
गर्भाच्या ओझ्यानं कोसळून पडली

दुःखाच्या ओझ्याने ती कोलमडून पडली असली तरी एकूण व्यवस्थेच्या विरोधात तिने केलेला विद्रोह महत्वाचा आहे. आता कुठेतरी स्त्री नव्याने या व्यवस्थेच्या विरोधात बोलू लागली आहे. याचे चित्रण करताना प्रतिमा इंगोले लिहितात,

जावईबुवा ! जास्त ! बोलाचं काम नायी
पोसीन लेक मायी ! धाळत तिले नायी

स्वतः अत्याचार सहन करणारी ही स्त्री जेव्हा आपल्या लेकीवर अनन्वित अत्याचार होतात तेव्हा मात्र ती बंड करून उठते. आयुश्यभर लेकीला सांभाळायला तयार होते.

कौटुंबिक, सामाजिक पातळीवर लढणारी ही स्त्री जितक्या चिवटपणे शेतीला, दुष्काळाला सामोरी जाते तितक्याच चिवटतेने घराला घरपण देण्यासाठी कश्टत राहते. संकटावर मात करूनही टिकून राहण्याचा भूमीचा धर्म सांभाळणारी स्त्री गावाने अन्याय केले तरी गावपण टिकवू पाहते. अशी ही स्त्री पाताळात उभी असूनही आभाळाएवढी उंच वाढते. एवढेच नव्हे तर जीवन देणारी अशी स्त्री दुष्काळातसुध्दा वाहणा—या नदीसारखी वाटते. तिच्याबद्दलचे हे उद्गार तिचे चिरंतनत्व आणि योगदान अधोरेखित करणारे आहेत. एवढे सगळे कष्ट सोसूनही तिचा प्रवास एकाकीच आहे याचे भान देताना भालेराव लिहितात,

सत्व राखून आणि दुःख चाखूनही
तिला होत येत नाही सीता—सावित्री
तिचं दुःख तिलाच गिळावं लागतं
तिच्यासाठी दुभंगत नाही धरित्री

तिच्या वाटयाला येणारे हे एकाकीपण, हतबलता, तुटलेपणा, त्रयस्थता एकूणच महानगरीब जीवनजाणिवेशी समांतर जाणारे आहे. उलट तिचे प्रक्षेपण देशी जाणिवेतून आणि भूमीतून होत आहेय  हे महत्वाचे. कदाचित आशयातील या सहजतेमुळे आणि सोपेपणामुळेच मान्यवरांनी कृषिनिष्ठ कवितेकडे दुर्लक्ष केले असावे. स्त्रीच्या वाटयाला येणारे हे दुभंगलेले, अस्तित्वहीनत्व, एकटेपण कितीतरी कवितांमधून समर्थपणे आले आहे. स्त्रीच्या वाटयाला आलेले हे दुभंगलेपण महानोरांनी तिची कहाणी व भालेरावांनी कुळंबिणीची कहाणी या स्वतंत्र कवितासंग्रहामधून स्त्रीच्या आयुष्याचे सर्व पदर उलगडून दाखवले आहेत.

ही स्त्री विद्रोही असली आणि उजळमाथ्याने कुणबीपण मिरवत असली तरी तिचा विद्रोह, नकार इथल्या समाजव्यवस्थेत व दुश्काळापुढे टिकाव धरू शकत नाही. याचेही वास्तव भान ही कविता अधोरेखित करते. तिच्या या वेदना व्यक्त करण्यासाठी तिला व्यावपीठही नाही आणि हे जात्याचे माध्यम आहेय त्या जात्यावर दहायला बसल्यावर ती व्यथा बोलू लागते तेव्हाही दळण संपते आणि व्यथेची अभिव्यक्ती अर्धवटच राहते. अशा या मुक्या, अबोल शब्दांची कहाणी सांगताना महानोर लिहितात,

कुठे शिकली गे माये, दुःख सोसण्याच्या वेणा
सा—यांसाठी हसण्याचा पुन्हा खोटाच बहाणा

अशी ही स्त्री भूमाता असल्याने स्वतःच्या सरणासाठी लागणा—या गोव—या स्वतःच आयुष्यभर थापते. म्हणजेच आपला रोजचाच मरण सोहळा साजरा करीत जाते.

संत तुकारामांच्या जातकुळीची ही भावना व्यापकता धारण करीत असतानाच ती तमाम मराठी माणसांचे श्रध्दास्थान असलेल्या रूक्मिणीच्या रूपाने येते.

झाली कुणी रखमा विळादोरी हातामधी
टिळा लावला भुईचा गर्भातच जन्माआधी
(श्रीकांत देशमुख)

***समारोप :—***

जन्माआधीपासूनचे भूमीशी असलेले नाते टिवण्यासाठी व त्या भूमीवर उभा राहत असलेला गाव आणि गावपण आकारित, संस्करित करण्यासाठी भूमिनिष्ठ स्त्री आयुश्यभर कश्ट करीत राहते. घराला गावपण आणि गावाला घरपण देते. माणसांना माणूसपण देते. गावाला भूमीपण देते. अशी ही सर्व आघाडयांवर लढणारी, मोडून पडली तरी पुन्हा उभी राहणारी सक्षम स्त्री विकासाच्या नव्या दिशा सूचित करताना आपले चिरंतनत्व सिध्द करते. टिकून राहणे व सर्जनशील असणे हे शेतीचे सर्व संदर्भ स्वतःमध्ये अनुस्यूत असलेली ही भूमिनिष्ठ भूमिकन्या आपले कुणबिकीपण समर्थपणे पेलताना दिसते. तिची ही भूमिका सर्जनशील, वंशसातत्य आणि भूमितत्वाशी नाते सांगणारी आहे. म्हणूनच अशा या स्त्रीचे सर्जनशीलत्व कुणबिकीसारखे उजळमाथ्याने मिरवण्यासारखे आहे.

***संदर्भ सूची***

1.सार्वेकर कैलास — मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास
2.भवाळकर तारा — लोकपरंपरा आणि स्त्री प्रतिमा
3.गोरे दाद — महात्मा फुले यांची कविता

| | | |
|---|---|---|
| 4.वाघ विठ्ठल | – | काळया मातीत मातीत |
| 5.भालेराव इंद्रजित | – | पेरा |
| 6.यादव आनंद | – | हिरवे जग |
| 7.खेडेकर जयराम | – | मेघवृष्टी |
| 8.चौधरी बहिणाबाई | – | बहिणाबाईची गाणी |
| 9.महानोर ना. धों. | – | रानातल्या कविता |
| 10.भालेराव इंद्रजित | – | कुळंबिणीची कहाणी |
| 11.देशमुख श्रीकांत | – | आषाढमाती |
| 12.कदम महेंद्र | – | कवितेची शैली |